2018-19


46
2019

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - IV



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १६ | महात्मा जोतीराव फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांची प्रासंगिकता<br>**आकाश शेषराव बांगर** | ६४-६६ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार<br>**अमोल भाऊराव बंड** | ६७-७० |
| १८ | सामाजिक चळवळीत विचारवंताचे योगदान<br>**प्रा. दिगंबरकुमार प्रल्हादराव लांडगे** | ७१-७५ |
| १९ | पंडित जवाहरलाल नेहरु यांचे आदर्शवादी विचार<br>**कु. अलफीया ई. खाजावाले**<br>**प्रा. डॉ. जीवन पवार** | ७६-८० |
| २० | समाजसुधारणा चळवळीत राष्ट्रसंत तुकडोजी ऐतिहासिक योगदान<br>**प्रा. डॉ. किशोर एच. बारापात्रे** | ८१-८३ |
| २१ | मध्ययुगातील प्रमुख महिला संतांचे स्त्री कल्याणासंबंधी सामाजिक प्रबोधन<br>**प्रा. डॉ. एम. पी. खेडेकर** | ८४-८६ |
| २२ | महात्मा फुलेंच्या विचारातील सामाजिक व आर्थिक क्रांती<br>**प्रा. डॉ. मधुकर श्रीराम ताकतोडे** | ८७-९० |
| २३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी अर्थव्यवस्थेसंबधी विचार<br>**डॉ. उल्हास ना. मेडशीकरं** | ९१-९२ |
| २४ | सामाजिक कार्यामध्ये गो. ग. आगरकरांचे योगदान<br>**डॉ. नाना वानखडे** | ९३-९६ |
| २५ | पं. नेहरुचे लोकशाही विषयक विचार<br>**प्रा. नीता पांडे** | ९७-१०० |
| २६ | दलित व समाज परिवर्तन<br>**प्रा. विनय पैकिने** | १०१-१०२ |
| २७ | बंजारा महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती<br>**प्रेमसिंग प्रल्हाद जाधव** | १०३-१०५ |
| २८ | सामाजिक चळवळीत विचारवंताचे ऐतिहासिक योगदान<br>**राजेंद्र बापूराव वाकडे** | १०६-११० |
| २९ | माहीतीचा अधिकार आणि त्याचे महत्व<br>**प्रा. रमेश गुलाबराव सुरळकर** | १११-११७ |
| ३० | महात्मा गांधी आणि शाश्वत विकास<br>**डॉ. सचिन ज. नेले** | ११८-१२१ |





330

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

# २९. माहीतीचा अधिकार आणि त्याचे महत्व

**प्रा. रमेश गुलाबराव सुरळकर**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा.

**प्रस्तावना**

भारत सरकारने १५ जुन २००५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संमत केला असून मुलभूत अधिकाराच्या कलम १९ (१) मध्ये समाविष्ट आहे . शासकीय किंवा निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयांच्या कामकाजात जास्तीत जास्त पारदर्शकता यावी आणि सर्वसामान्य नागरिकांना कार्यालयातील कामकाजाची माहिती व्हावी अधिकृत कागदपत्र मिळवीत. तसेच नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम हा १२ ऑक्टोबर २००५ पासून अमलात आला आहे. हा कायदा शासकीय व निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन नियंत्रित महामंडळे, संस्था, कंपन्या यांच्यापुरता मर्यादित नसून शासनाच्या अधिसुचनेनुसार स्थापन झालेल्या किंवा शासनाकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आर्थिक लाभ घेणाऱ्या संस्था उदा. शिक्षण संस्था बँका, ट्रस्ट इत्यादींना लागू आहे. या कायद्याद्वारे केवळ दस्तऐवजांची माहिती प्राप्त करण्याचे अधिकार प्राप्त झाले नसून एखाद्या सार्वजनिक कामाची पाहणी व तपासणी करणे, त्यामध्ये वापरलेल्या मालाच्या दर्जाची तसेच एखाद्या संस्थेने खरेदी केलेल्या मालाच्या दर्जाची तपासणी करणे असे अधिकारही प्राप्त झालेले आहेत.

**माहितीच्या अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-** माहितीचा अधिकार कायदा स्विकारण्यामध्ये जगातील पहिला देश स्वीडन हा ठरला असून १९६६ मध्ये 'फ्रिडम ऑफ प्रेस अॅक्ट' असा कायदा सर्वप्रथम मान्य केला. स्वीडननंतर डेन्मार्क, फीनलॅंड व नॉर्वे या देशांनी माहितीच्या अधिकाराचे कायदे केले. युनोने १९४६ साली नागरिकांना माहिती मिळविण्याचे स्वातंत्र्य हा मुलभूत अधिकार म्हणून मान्य केला. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपियन युनियनने माहितीचा अधिकार अनिवार्य मानला. १९६६ साली अमेरिकेत 'फ्रीडम ऑफ इन्फॉर्मेशन अॅक्ट' स्विकारण्यात आला. १९६६ मध्ये ब्रिटनने माहितीचा अधिकार स्विकारला. १६ डिसेंबर १९६६ रोजी नागरी व राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यानुसार. १९७२ मध्ये राष्ट्रकुल संघटनेने १९७८ मध्ये, युनेस्कोने तसेच १९८२ च्या दरम्यान कॅनडा, फ्रान्स व ऑस्ट्रेलिया या राष्ट्रकुलातील देशांनी माहितीच्या अधिकाराचा पुरस्कार केला. १९९० पर्यंत जगातील १३ राष्ट्रांनी माहितीचा अधिकार कायदा लागू केला होता. १९९० नंतर भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू केला होता. २८ डिसेंबर २००५ रोजी चीनने 'द फ्रिडम ऑफ गव्हर्नमेंट इन्फॉर्मेशन ऑफ लॉ' असा कायदा लागू केला. १६ नोव्हेंबर २००५ ट्युनिश येथील जागतिक संमेलनात या अधिकाराचा पुनरुच्चार करण्यात आला. जागतील माहिती अधिकार सप्ताह ६ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर पर्यंत असतो. महाराष्ट्र माहिती अधिकार दिन २८ सप्टेंबर हा असतो.

330



Scanned by TapScanner

**भारतातील माहितीच्या अधिकाराची पार्श्वभूमी :-** भारतामध्ये ब्रिटिश काळात शासन कारभाराबाबत 'अधिकृत गोपनीयता कायदा' १९२३ नुसार शासन कारभाराची माहिती जनतेला खुल्या स्वरुपात प्राप्त होत नव्हती. हीच स्थिती स्वातंत्र्योत्तर काळातही होती. त्यानंतर मात्र सरकारच्या कारभाराची माहिती जनतेला खुलेपणाने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व प्रशासकीय कारभारात पारदर्शकता येण्याचा विचार पुढे आला. भारतात राष्ट्रीय पातळीवर माहितीच्या अधिकाराचा कायदा होण्याच्या प्रयत्नामध्ये राजस्थानमधील श्रीमती अरुणा रॉय यांच्या नेतृत्वाखाली 'मजदूर किसान शक्ती संघटन' महत्त्वपूर्ण ठरले.

१९९६ मध्ये The National Compaign for peoples Rights to information या संघटनेची स्थापना झाल्यानंतर समाजातील विविध घटकांनी उदा. श्री हर्ष मंदर, अण्णा हजारे, चंडीप्रसाद भट्ट, श्रीमती शीला भारती इ. सामाजिक कार्यकर्ते, वकीली, पत्रकारिता या क्षेत्रातील मान्यवरांच्या पुढाकाराने यात भर आली व [illegible] प्रेस कौन्सिल ऑफ इंडीयाने संयुक्तपणे माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाचा मसुदा तयार केला. या संघटनांच्या प्रयत्नांना आलेल्या यशामुळे तामिळनाडू, गोवा या राज्यांनी १९९७ मध्ये माहितीच्या अधिकाराचे विधेयक मंजूर केले. २००० मध्ये राजस्थान, कर्नाटक, २००१ मध्ये दिल्ली, २००२ मध्ये महाराष्ट्र, आसाम या राज्यांनी माहितीच्या अधिकाराचा कायदा केला. केंद्रसरकारने या संदर्भात एच. डी. शौरी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने १९९७ मध्ये माहितीच्या अधिकाराच्या कायद्याचा मसुदा तयार केला. केंद्रातील सत्ताबदलानंतर वाजपेयी सरकारने Freedom of information Bill २००० हे विधेयक तयार केले. सदर विधेयक डिसेंबर २००२ मध्ये संसदेत संमत झाले या विधेयकावर जानेवारी २००३ मध्ये राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली. वाजपेयी सरकारद्वारे हा कायदा मंजुर करण्यात आला. त्यानंतर त्याची अधिसूचना न काढल्याने सर्वोच्च न्यायालयात वरील दोन्ही संस्थांनी याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारला मुळे २००४ मध्ये तसा आदेश दिल्यानंतर केंद्रसरकारने National Advisory council ची स्थापना केली. या परिषदेने १५ ऑगस्ट २००४ रोजी केंद्र सरकारच्या माहितीच्या अधिकाराचा आग्रह करणारे पत्र पाठवले. या आधारे २००५ साली हा कायदा अमलात आला.

**माहिती अधिकार, अधिनियमाची उद्दीष्ट्ये**

१. १.शासकीय कामकाजाच्या पारदर्शक व्यवहारासाठी.

२. २.नागरिकांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी.

३. स्वच्छ शासनासाठी

४. ४.भ्रष्टाचार दूर करण्यासाठी

५. ५.लोकशाही बळकट करण्यासाठी.

६. नागरिकांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी

७. नागरिकांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अधिकाराची व्यवहार्य पद्धती आखून देण्यासाठी

९. केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोगाकडे माहितीच्या अधिकारा संदर्भात तक्रारीचे निवारण करण्यासाठी

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

**माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदी**

१. माहिती जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला माहिती मागण्याचा अधिकार आहे.

२. माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे हे उघड करणे अर्जदारावर बंधनकारक नसते.

३. माहिती मागण्यासाठी नमुन्यातील अर्ज, संपर्काचा पत्ता आणि १०रुशुल्क पुरेसे ठरेल.

४. एखादया माहितीसाठीचा अर्ज सहाय्यक माहिती अधिकाऱ्याकडे दिलेला असेल व सदरचा अर्ज मुख्य कार्यालयाकडे पाठवावयाचा असेल तर आणखी पाच दिवसाची जास्त मुदत दिली जाऊ शकते.

५. एखादया नागरिकाने जीवीत स्वातंत्र्य या संदर्भात माहिती मागितली असेल तर ती ४८ तासाच्या आत देणे बंधनकारक आहे.

६. जर मागणी केलेली माहिती त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेची असेल तर ती माहिती देण्यासाठी ४० दिवसाची मुदत आहे.

७. माहितीच्या अधिकारामध्ये कामाचे निरिक्षण किंवा तपासणी या बाबतीचा समावेश करण्यात आला आहे.

८. सर्वसाधारण माहिती एखाद्या व्यक्तीने मागितली असेल तर ती ३० दिवसाच्या आत देणे बंधनकारक आहे.

९. जनमाहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे ३० दिवसाच्या आत अपिल करता येते.

१०. केंद्रीय किंवा राज्य प्रथम अपिल अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द केंद्रीय वा राज्य माहिती आयुक्ताकडे ९० दिवसाच्या आत अपिल करता येते.

११. चुकीची माहिती देऊन दिशाभूल केल्यास जनमाहिती अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करता येते.

१२. अर्ज सादर केल्यापासून वेळेच्या आत माहिती न पुरवल्यास दंड आकारणीची तरतुद आहे.

१३. अर्ज एका सर्व प्राधिकरणाकडून दुसऱ्या प्राधीकरणाकडे वर्ग केल्यास पाच दिवसात करणे बंधनकारक आहे

१४. माहिती देण्यासाठी व्यवहार्य यंत्रणा उभारणे, राज्यकारभारात पारदर्शकता आणणे, राज्यकारभारात खुलेपणा निर्माण करणे, राज्यकारभार व शासन व्यवस्थेतील भ्रष्टाचारास आळा घालणे, नागरिकांना शासकीय कारभारात सहभागी होता यावे. इत्यादी तरतुदी समाविष्ट आहेत.

**अर्जदारांचे हक्क व माहिती देण्याची पध्दती :-** माहितीचा अधिकार कायद्याच्या कलम ४ (१) (ब) नुसार केंद्र व राज्य शासनाच्या नियंत्रणात असलेल्या कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरण किंवा संस्थाना माहितीची मागणी करणाऱ्या अर्जदाराला माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती देणे सोयीचे व्हावे म्हणून सर्व अभिलेखांची वर्गवार विभागणी करून ती सूचिबद्ध करून ठेवणे, संबंधित माहितीचे संगणकीकरण करून अशा संकेतस्थळाद्वारे (वेबसाइट) जनतेला उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. या कायद्याची अधिसूचना जाहिर झाल्याच्या तारखेपासून म्हणजेच १५ जून २००५ पासून १२० दिवसाच्या आत सर्व प्राधिकरणांनी प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

१. संबंधित प्राधिकरणाचे संघटन.

२. कामाचे स्वरुप व कर्तव्ये स्पष्ट करणे.

३. त्यांच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अधिकार व वेतन नमुद करणे.



Scanned by TapScanner

४. निर्णय घेण्याची कार्यपद्धती व त्यासाठी निश्चित केलेली प्रमाणके नमूद करणे

५. प्राधिकरणाच्या एकूण कार्यपद्धतीचे नियम, नियमावली, सूचना यांचा तपशील देणे.

६. निर्णयप्रक्रियेसाठी गठीत केलेल्या मंडळाच्या समित्या व उपसमित्या त्यांची कार्यपद्धती यांची माहिती .

७. संस्थेच्या आर्थिक अंदाजपत्रकाचा अहवाल

८. ज्या व्यक्तींना खास सवलती ,परवाने व अधिकारपत्रे दिली गेली आहेत त्यासंबंधी सविस्तर माहिती.

९. संगणीकरण करून ठेवलेल्या माहितीचा तपशील

१०. जनतेला माहिती उपलब्ध करून देण्यासाठी असलेली सुविधा .

११. जनमाहिती अधिकारी यांचे नाव व पत्ता इत्यादी

१२. याशिवाय कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधीत एखादी माहिती योग्य ती फी भरून प्राप्त करण्याचा अधिकार नागरिकांना आहे

१३. कोणत्याही सार्वजनिक कामाची पाहणी करण्याचा ते काम नियम अटीप्रमाणे आहे किंवा नाही याची खात्री करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे

१४. एखाद्या संस्थेच्या दस्तऐवजाची तपासणी करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

१५. प्राधिकरणाने संगणीकृत केलेल्या माहितीची प्रिंटआउट किंवा फ्लॉपी घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

१६. माहितीची मागणी करणाऱ्या अर्जदाराला माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे हे जाहिर करणे बंधनकारक नाही

**सार्वजनिक अधिकाऱ्याची कर्तव्ये**

१. जनतेने मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देणे संबंधित प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्याची जबाबदारी असते

२. ही माहिती ३० दिवसाच्या आत देणे संबंधीत अधिकाऱ्यावर बंधनकारक असते.

३. एखाद्या व्यक्तीचे जीवित स्वातंत्र्य धोक्यात असल्यास त्यासंबंधीची माहिती ४८ तासात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

४. मागणी केलेली माहिती जर एखादया त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेशी संबंधीत असेल आणि त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेने जर ती माहिती गोपनीय मानलेली असेल तर जनमाहिती अधिकारी अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या त्या त्रयस्थ व्यक्ती किंवा

५. संस्थेला नोटीस देतो व त्रयस्थ व्यक्ती किंवा संस्थेचे काय मत आहे यासंबंधी ती नोटीस मिळाल्यापासून १० दिवसात निर्णय घेतो

६. वरील मुदतीत उत्तर प्राप्त झाले किंवा नाही झाले तर अर्ज मिळाल्यापासून ४० दिवसाच्या आत निर्णय होणे अधिकाऱ्यावर बंधनकारक असते

७. जनमाहिती अधिकाऱ्याच्या निर्णयावर अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल करण्याचा अधिकार त्रयस्थ पार्टीला आहे

**अपिलीय अधिकारी :-** एखाद्या जनमाहिती अधिकाऱ्याने या कायद्यातर्गत दिलेला अर्ज स्वीकारला नाही. किंवा माहिती मुदतीत दिली नाही किंवा ज्यादा फी आकारली किंवा चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली तर संबंधीत व्यक्ती ३० दिवसाच्या आत अपिलीय अधिकाऱ्याकडे अपिल करुशकते. तेव्हा ३० दिवसात किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसात निर्णय देणे अपिलीय अधिकाऱ्यावर बंधनकारक असते.

**राज्य माहिती आयुक्त :-** जर अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयामुळे संबंधीत व्यक्तीचे समाधान झाले नाही तर ती व्यक्ती केंद्रीय किंवा राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसात अपिल करु शकते .या संदर्भात संबंधीत निर्णय माहिती आयुक्त देतात. हा निर्णय कायद्यानुसार अंतिम समजला जातो.

**केंद्रीय माहिती आयोग (Central Information Commission)**

माहिती अधिकार अधिनियम -२००५ मधील कलम १२ ते १४ मध्ये केंद्रीय माहिती आयोगा संदर्भात तरतूद आढळते. केद्रसरकारच्या राजपत्रामधील अधिसूचनेनूसार अधिनियम २००५ मधील प्रकरण III कलम १२ अंतर्गत केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**केंद्रीय माहिती आयोगाची रचना :-** केंद्रीय माहिती आयोगात केंद्रीय आयुक्त आणि आवश्यक तेवढे इतर आयुक्त असतात. मात्र १० पेक्षा अधिक माहिती आयुक्त नसतील अशी तरतुदी आहे. राधाकृष्ण माथूर हे जून २०१७ पासून केंद्रीय माहिती आयोगाचे मुख्य आयूक्त म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय इतर ८ माहिती आयुक्त यशवर्धन आझाद, मंजुळा प्रकाश, प्रा महाभूषण श्रीधर, सुधीर भार्गव,बिमल झुल्का,दिव्य प्रकाश, अमिता भट्टाचार्य, बसंत सेठ कार्यरत आहेत.

**माहिती आयुक्ताची नियुक्ती :-** मुख्य माहिती आयुक्त आणि इतर माहिती आयुक्ताची नियुक्ती समितीच्या सल्यानुसार राष्ट्रपती करतात. या समिती मध्ये पंतप्रधान (अध्यक्ष) तसेच लोकसभेचा बिरोधी पक्षनेता आणि पंतप्रधानाने नियुक्त केलेला एक केंद्रीय कॅबिनेट दर्जाचे मंत्री यांचा समावेश असतो.

**माहिती आयुक्ताची पात्रता**

१. मुख्य माहिती आयुक्त आणि इतर माहिती आयुक्त या पदावर कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता,जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन व शासन इत्यादी क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असणाऱ्या व्यक्तीची निवड केली जाते.

२. मुख्य आयुक्त हा संसद किंवा राज्यविधिमंडळाचा सदस्य नसावा .

३. त्याने कोणतेही आर्थिक लाभपद धारण केलेले नसावे.

४. ती व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नसावी.

५. ती व्यक्ती कोणत्याही उद्योगधंदा किंवा व्यवसायाशी संबंधीत नसावी .

**माहिती आयुक्ताचा कार्यकाल**

१. मुख्य माहिती आयुक्ताचा कार्यकाळ ५ वर्षांचा असतो.

२. ५ वर्षाच्या कार्यकालानंतर त्याची पुर्ननियुक्ती होत नाही.

३. तो वयाची ६५ वर्षापर्यंत किंवा ५ वर्ष कालावधिसाठी पदावर राहू शकतो.

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

४. मुख्य आयुक्त आणि इतर आयुक्त क र्यकाल संपण्यापूर्वी आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतीकडे देऊन पदमुक्त होऊ शकतात.

**वेतन भत्ते व सेवाशर्ती :-** केंद्रीय माहिती आयुक्ताचा दर्जा हा निवडणूक आयुक्त पदाच्या समकक्ष आहे. त्यामुळे निवडणूक आयुक्त पदाला मिळाणाऱ्या सेवाशर्ती वेतन, भत्ते, व इतर सुविधा मुख्य माहिती आयुक्तास सुध्दा मिळतात. केंद्रीय माहिती आयुक्ताला दरमहा रुपये ९०,००० तर इतर आयुक्त यांना रु ८०,००० व इतर भत्ते सेवशर्ती पुरविण्यात येतात.

**बडतर्फे किंवा पदभ्रष्ट करण्याची पध्दती :-** केंद्रीय माहिती आयुक्त आणि इतर माहिती आयुक्तास राष्ट्रपती पुढील कारणावरुन बडतर्फे किंवा पदभ्रष्ट्र करु शकते.

१. एखाद्या गंभीर अपराधाबदल दोषी ठरविण्यात आले असेल तर .
२. तो आपल्या कार्यकालामध्ये इतर कोणतेही काम सवेतन करीत असेल तर .
३. मानसिक व शारीरिकदृष्टया दुर्बलतेमुळे काम करण्यास अपात्र किंवा त्यांचे आर्थिक किंवा इतर हितसंबंध बाधा आणत असतील तर. वरील कारणांची चोकशी करण्याचे आदेश राष्ट्रपती न्यायालयाच्या सल्याने करु शकतो. न्यायालयीन चोकशीमध्ये ती व्यक्ती दोषी आढळल्यास राष्ट्रपती संबंधित आयुक्तास पदमुक्त करु शकतो. याशिवाय न्यायालयीन चौकशी दरम्यान संबंधीत व्यक्तीस निलंबित करता येते किंवा कार्यालयात न येणाचा आदेश राष्ट्रपती देऊ शकतात.

**राज्य माहिती आयोग (The State Information Commission)**

राज्य माहिती आयोगाची तरतुद केंद्रीय अधिनियम २००५ मधील कलम १५ ते १७ नुसार करण्यात आलेली आहे. केंद्रीय माहिती आयोगाप्रमाणेच कलम १५ ते १७ नुसार राज्य माहिती आयोगाची रचना, नियुक्ती, पात्रता, कार्यकाल आणि बडतर्फे याबाबत तरतुदी आहेत राजशासनाच्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्यात 'राज्य माहिती आयोग' स्थापन करेल आणि राज्य माहिती आयोग पुढील व्यक्तीशी मिळून बनलेले असेल.

१. राज्य मुख्य माहिती आयुक्त.
२. पेक्षा अधिक नसतील इतके इतर राज्य माहिती आयुक्त .
३. साधारणतः राज्य मुख्य आयुक्त आणि इतर आयुक्ताची नेमणूक राज्यपाल पुढील समितीच्या शिफारशीने करतील अशी तरतुदी आहे. या समितीत मुख्यमंत्री विधानसभेचा विरोधी पक्षनेता व एक कॅबिनेट दर्जाचा मंत्री यांचा समावेश होतो. सद्यास्थितीत महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे मुख्य आयुक्त रत्नाकर गायकवाड आहेत. याशिवाय भास्कर पाटील डी.बी देशपांडे, एम.एच.शहा, व पी डब्ल्यु पाटील असे इतर ४ राज्य माहिती आयुक्त आहेत

**माहिती आयोगाचे अधिकार व कार्य (Power and Function of Information Commission)**

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ ते २० नुसार माहिती आयोगाचे अधिकार व कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

१. या कायद्यानुसार जनतेच्या तक्रारी स्विकारणे व त्याची चौकशी करणे हे केंद्रीय व राज्य माहिती आयोगाचे कर्तव्य आहे.



Scanned by TapScanner

२. या कायद्यातील कलमान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करतांना दिवाणी प्रक्रिया सहिता, १९०८ अन्वये दाव्याची चौकशी करतांना न्यायालयांना जे अधिकार आहेत तेच अधिकार केंद्रीय व राज्य माहिती आयोगाला आहेत.

३. या अधिनियमामध्ये तरतुद केलेली शास्ती लादणे.

४. केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग विहित करण्यात येईल, अशा कार्यपध्दतीवर अपिलावर निर्णय देईल

५. शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे.

६. कोणतेही न्यायालय किंवा कार्यालयाकडून शासकीय अभिलेखाची किंवा प्रतिची मागणी करु शकते.

७. साक्षीदार व दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी समन्स काढणे .

८. विशिष्ट स्वरुपातील माहिती मिळण्याची विनंती केली असेल तर माहिती पुरविणे .

९. माहिती किंवा माहितीचे प्रवर्ग प्रसिध्द करणे.

१०. अभिलेख ठेवणे,त्याची व्यवस्था ठेवणे व तो नष्ट करणे या संदर्भात त्याच्या पध्दतीमध्ये आवश्यक ते बदल करणे इत्यादी.

## संदर्भग्रंथ सूची

१. आऊटलाईन्स, ऑफ इंडियन लिगल हिस्ट्री,एम.पी.जे,वधवा अँड कंपनी,नागपूर.

२. बसु डी.डी.कमेंटरी ऑफ द कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया,प्रकाशन प्रेंटिंग हाल,खंड५

३. बाली एल.आर.डॉ.आंबेडकर और भारतीय संविधान ,भीम पत्रिका पब्लिकेशन.

४. बहिष्कृत भारत,दि .१८ जाने.१९२९ संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

५. बसू.दुर्गादास भारतीय राज्यघटनेची ओळख, लेक्सिस नेक्सिस पब्लिकेशन प्रा.लि.हरियाणा, भारत प्रथम आवृत्ती २०१४.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330